FORM-1 A

N.C.R.B.
I.I.F.-1

# पहिली खबर
## FIRST INFORMATION REPORT

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम 154 अन्वये (Under Section 154 Cr. P.C.)

1. राज्य State महाराष्ट्र, जिल्हा District मुंबई, पोलीस ठाणे Police Station ला.प्र.वि, पहिली खबर क्र. FIR No. ४२, वर्ष Year २०१९, दिनांक Date २८/११/२०१९

2. (i) अधिनियम Act भ्रष्टाचार प्रतिबंधक अधि १९८८, कलमे Sections ७
   (ii) अधिनियम Act ........, कलमे Sections ........
   (iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ........

3. (a) अपराधाची घटना : Occurrence of offence : वार Day गुरुवार, तारीख पासून Date from २२/११/१९, वेळ Time ........, तारीख पर्यंत Date to २७/११/१९, वेळ Time १८:०० वा

   वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा. Tick applicable portion)

   (1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
   (6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (10) 18.00 ते 06.00

   (b) पो. ठा. ला माहिती मिळालेचा Information received at P.S. तारीख Date २७/११/१९, वेळ Time ........

   (c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference : Entry No. १/१९, तारीख Date २८/११/१९, वेळ Time 02:24

4. माहितीचा प्रकार Type of Information : लेखी, लेखी / तोंडी Written / Oral ........

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण Place of Occurrence : (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा Direction and distance from P.S. दक्षिणेस ८ कि.मी., चौकी / बीट / दुरक्षेत्र नाव व क्र. Chouki/Beat/O.P. Name and No. ........

   (b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव Address of Occurrence Name घनकचरा व्यवस्थापन कार्यालय, ठिकाणाचे नंबर No. if any 'सी' वार्ड, गल्ली Ward बृ.म.पा., रस्त्याचे नाव Name of road ........

   जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण Nearest identifiable Place चंदनवाडी, गाव Village मुंबई, पोस्ट Post ........, तालुका Taluka ........, जिल्हा Distt. मुंबई, राज्य State महाराष्ट्र

   (c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो. स्टे. चे नाव In case, outside the limit of this Police Station ........, तालुका Taluka ........, जिल्हा Distt. ........, राज्य State ........

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.

   (a) नाव Name प्रशांत कांबळे (b) वडीलाचे / पतीचे नाव Father's /Husband's Name प्रकाश कांबळे

   (c) जन्म तारीख व वय Date of Birth & Age ३७ वर्षे (d) राष्ट्रीयत्व Nationality भारतीय, फोन नं. Phone No. ८०२८३८८७८७

   (e) पारपत्र क्रमांक Passport No. ........ दिल्याचा दिनांक Date of Issue ........ दिल्याचे ठिकाण Place of Issue ........ (f) व्यवसाय Occupation नोकरी

   (g) धर्म Religion ........, जात Caste ........, जनजात Sub-Caste ........

   (h) पत्ता : Address : डी-३१०, गल्ली / सर्वे नं. Ward प्लॉट नं. ०१ आणि ०२, घर / नाव नंबर House/Name No. सेक्टर १८, फोन / मो. नंबर Phone/M. No. अहिंसा गृहनिर्माण सोसायटी, Par No. बीट नं. Card No.

   रस्त्याचे नाव Road कामोठे, जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable place मानसरोवर, नवी मुंबई, गाव Village ........ पोस्ट Post ........ पो. स्टे. P. Stn. ........

   तालुका Taluka ........ जिल्हा Distt. नवी मुंबई, राज्य State महाराष्ट्र, सध्याचा पत्ता Present Address ........

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयीताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासीक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)

   Details Name & Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to case diary.)

   • ज्ञानेश्वर कोंडीराम चव्हाण, वय-३० वर्षे, धंदा-नोकरी, रा.डी. वर्धमान हाईट्स ०२ रामाळा, बी विंग, रुम नं. २०५, टि.व्ही. टॉवर, कात्रप, बदलापूर (पुर्व) जि. ठाणे मुळ गाव-मु. भारंबा, ता-कन्नड, जि. औरंगाबाद, मो.नं. ८८८८४०५०८७

फिर्यादी डॉ. प्रशांत प्रकाश कांबळे वय ३१ वर्ष रा.डी. डी-३१०, प्लॉट नं. ०१ आणि ०२, सेक्टर १८, अहिंसा गृहनिर्माण सोसायटी, कामोठे, मानसरोवर, नवी मुंबई यांचा स्वतंत्र पानावर नोंदविलेला जबाब हा प्रथम खबरी अहवाल म्हणून संबोधण्यात येत आहे.

समक्ष

(signature)

अभय दाभाडे
पोलीस निरीक्षक
ला.प्र.वि. मुंबई

(signature)

फिर्याद

दि. २८.११.२०१८

मी, प्रशांत प्रकाश कांबळे, वय– ३१ वर्षे, धंदा–नोकरी, कनिष्ठ लेखा परिक्षक व लेखा सहाय्यक, बृहन्मुंबई महानगरपालिका,पाणी पुरवठा मलनिस्सारण (W.S.S.), मुख्य कार्यालय, नविन इमारत, महापालिका मार्ग, मुंबई– ४०० ००१. रा.ठि. डी–३१०, प्लॉट नं. १ आणि २, सेक्टर १८, अहिंसा गृहनिर्माण सोसायटी, कामोठे, मानसरोवर, नवी मुंबई– ४१० २०९. मो.क्र. ९०२९३९८७८७.

.........

मी वरीलप्रमाणे असून वर नमुद पत्त्यावर माझे कुटूंबासह १० वर्षापासून रहावयास आहे. माझे कुटूंबात माझी पत्नी नामे श्रीमती शुभांगी, वय– ३१ वर्षे, मुलगा कु. संकल्प, वय दिड वर्षे, आई श्रीमती प्रमिला प्रकाश कांबळे, वय– ४६ वर्षे, भाऊ श्री. रोहीत प्रकाश कांबळे, वय– २५ वर्षे असा परिवार आहे.

माझे चुलते दिवंगत दिपक पांडूरंग कांबळे हे बृहन्मुंबई महानगरपालिका, सी विभाग येथे घनकचरा व्यवस्थापन येथे सफाई कामगार म्हणून काम करीत होते. त्यांचे सेवेत असताना दिनांक १७.१०.२०१७ रोजी निधन झाले. त्यांच्या पश्चात त्यांची पत्नी श्रीमती दिपीका दिपक कांबळे (माझी काकी) या असून त्या अशिक्षीत आहेत. त्या अशिक्षीत असल्याने त्यांची सर्व कामे मीच करतो.

माझी काकी श्रीमती दिपिका दिपक कांबळे यांनी सहाय्यक मुख्य पर्यवेक्षक कार्यालय, सी विभाग, यांना माझे काका दिवंगत दिपक पांडूरंग कांबळे यांचे मृत्यूनंतर त्यांचे पत्नीस (माझी काकी) अदयापपर्यंत कुटूंब निवृत्ती वेतन व उपदान मिळावे तसेच त्यांना वारस हक्क म्हणून नोकरी (P.T.) मिळावी यासाठी लेखी अर्ज केला होता. त्याबाबत सर्व कागदपत्रांची पुर्तता दिनांक १४.११.२०१७ रोजी केली होती. सदरच्या कागदपत्रांची पुर्तता करून सुध्दा आजतागायत माझे काकीस कुटूंब निवृत्ती वेतन व उपदान व वारसहक्क म्हणून नोकरी (P.T.) मिळालेली नाही. सदरबाबत मी सी विभाग, घनकचरा व्यवस्थापन कार्यालयात विचारणा करण्यासाठी गेलो असता असे कळाले की, त्या फाईल सेवाअभिलेख (Service Record) या कार्यालयात लिपीक ज्ञानेश्वर चव्हाण यांचेकड दिनांक २५.०९. २०१८ रोजी व दिनांक २८.०९.२०१८ रोजी गेल्या आहेत.

त्यामुळे मी लिपीक ज्ञानेश्वर चव्हाण कार्यरत असलेल्या सेवाअभिलेख कार्यालयात विचारणा करण्यासाठी गेलो असता त्यांनी मला प्रत्येक वेळी काही कारणे देऊन टाळाटाळ केली. त्यानंतर मी पुन्हा दिनांक २२.११.२०१८ रोजी लिपीक ज्ञानेश्वर चव्हाण यांना पुन्हा भेटण्यास गेलो असता त्यांनी मला असे सांगितले की, '' त्यांची बदली घनकचरा व्यवस्थापन येथे झाली असून रजेच्या कागदपत्रांमध्ये काही त्रुटी आहेत, त्याकरीता काही खर्च करावा लागेल, आणि ते काम मीच करून देणार. तसेच त्यांचे जागी श्री. पांचाळ यांची बदली झाली असली तरी ते काम सेवाअभिलेख कार्यालयात जाऊन मीच करणार आहे.''

त्यानंतर दिनांक २६.११.२०१८ रोजी ज्ञानेश्वर चव्हाण यांनी त्यांचा मोबाईल क्र. ९०८२४७६५१४ वरून माझा मोबाईल क्र. ९०२९३९८७८७ वर फोन केला असता मी फोन रिसीव्ह करू शकलो नाही. त्यानंतर ज्ञानेश्वर चव्हाण यांना मी परत फोन केला असता त्यांनी मला काकांच्या फाईल संबंधाने बोलणी करण्यास या असे सांगून तयारीत या असे मला सांगितले.

समक्ष

(अभय दाभाडे),
पोलीस निरीक्षक,
ला.प्र.वि., मुंबई

मला ज्ञानेश्वर चव्हाण यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने मी दिनांक २७.११.२०१८ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक वभाग येथे तक्रार देण्यासाठी आलो. त्यावेळी पोनि दाभाडे यांनी ज्ञानेश्वर चव्हाण हे लाचेची मागणी करीत असल्याबाबत माझा लेखी तक्रार अर्ज लिहून घेतला. त्यानंतर पोनि दाभाडे यांनी दोन शासकीय पंचांना पाचारण करून त्यांची ओळख करून दिली. त्यावर पोनि दाभाडे यांनी पंचांना थोडक्यात हकिकत सांगून तक्रार अर्ज पंचांना वाचण्यास दिला. पोनि दाभाडे यांचे सुचनेवरून सदरच्या तक्रार अर्जावर दोन शासकीय पंचांनी स्वाक्षरी करून पोनि दाभाडे यांनी स्वत: स्वाक्षरी करून तक्रार अर्ज स्वत:चे ताब्यात ठेवला.

त्यानंतर पोनि दाभाडे यांनी सपोआ विजयकर व पोलीस पथकासह पंचांसमक्ष पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगून पडताळणी दरम्याने माझे शर्टाच्या आतील बनियनला डिजीटल व्हाईस रेकॉर्डर लावण्यात येणार असून संभाषण ध्वनीमुद्रीत करण्यात येणार असल्याचे सांगितले. त्याप्रमाणे दिनांक २७.११.२०१८ रोजी लोकसेवक ज्ञानेश्वर चव्हाण यांचे सी विभाग, मनपा कार्यालय, चंदनवाडी येथे पडताळणी करीता डिजीटल रेकॉर्डर लावून पाठविले असता लोकसेवक ज्ञानेश्वर चव्हाण यांची भेट झाली. त्यावेळी लोकसेवक यांनी मला चार असे बोलले, त्यावर मी कमी कराना असे सांगितले असता लोकसेवक यांनी कागदपत्रांत खाडाखोड आहे, तेराची एचपीएल झालेली ती ईएल करायची आहे असे सांगितले. त्यावर मी चार हजार जास्त होत आहेत जरा कमी करा असे सांगताच लोकसेवक यांनी पाचशे कमी करू असे सांगून लाचेची मागणी केली. त्यावर मी कधी दयायचे पैसे असे विचारणा करता त्यांनी उदया या, परवा या असे सांगितले. त्यानंतर कारवाई स्थगित करून मला पोनि दाभाडे यांनी घरी जाण्यास सांगून उदया सकाळी १०.०० वा. येण्यास सांगितले.

त्याप्रमाणे मी दिनांक २८.११.२०१८ रोजी ला.प्र.वि. कार्यालयात हजर झालो. त्यावेळी पोनि दाभाडे यांनी मला लोकसेवक यांनी लाचेच्या रकमेची मागणी केली असून आज रोजी सापळा कारवाई करावयाची आहे असे सांगितले. त्याप्रमाणे मला सापळा कारवाईच्या वेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचना दिल्या. त्यानंतर मला ब्युरो कार्यालयाचे गोपनिय कक्षात नेवून माझे कडून लाचेकरीता वापरण्यात येणारी रक्कम रू. ३,५००/–(रू. ५००/–दराच्या ७ भारतीय चलनी नोटा) काढून घेतली. त्यावेळी सदरच्या नोटांना ॲंथ्रासीन पावडर लावण्यात येणार असल्याचे सांगून त्यांचे गुणधर्म व प्रात्यक्षिक करून दाखविले. तसेच पोनि दाभाडे यांनी लोकसेवक यांनी लाचेची रक्कम स्विकारल्यावर मला केसांवर डावा हात फिरवून इशारा करण्यास सांगितले. त्यावेळी पोलीस पथक हे कोणास संशय येणार नाही असे थांबून पुर्व नियोजीत इशारा मिळताच लोकसेवक यांस रंगेहात पकडतील असे सांगितले.

त्यानंतर ब्युरो कार्यालयाचे गोपनिय कक्षात पंचांसमक्ष लाचेच्या रकमेस ॲंथ्रासीन पावडर लावली. त्यानंतर सापळा कारवाईकरीता ब्युरो कार्यालयातून निघून सापळा कारवाईकरीता लोकसेवक यांचे सी विभाग, मनपा कार्यालय, चंदनवाडी येथे आलो. त्यावेळी माझे शर्टाचे आतील बनियनला डिजीटल व्हाईस रेकॉर्डर लावून पाठविले. त्यावेळी माझे पाठोपाठ पोलीस पथक काही अंतर ठेवून होते. मी लोकसेवक यांना भेटण्यास त्यांचे कार्यालयात पंचासह गेलो

समक्ष

(अभय दाभाडे),
पोलीस निरीक्षक,
ला.प्र.वि., मुंबई

असता ते जेवण्याकरीता निघून गेल्याचे समजले. लोकसेवक हे मला भेटून न आल्यामुळे परत पोलीस थांबलेल्या ठिकाणी मरीनलाईन स्टेशनच्या बाहेर, चंदनवाडी येथे आलो.

त्यानंतर थोडया वेळाने पुन्हा माझे शर्टचे आतील बनियनला डिजीटल व्हाईस रेकॉर्डर लावून पाठविले असता लोकसेवक हे घनकचरा व्यवस्थापन कार्यालयात उपस्थित होते. त्यावेळी मी लोकसेवक ज्ञानेश्वर चव्हाण हे बसलेल्या टेबल जवळ जाऊन माझे काकीच्या कामाबाबत चर्चा केली असता, त्यांनी फाईल सहीसाठी ठेवलेली आहे असे सांगितले. त्यावर मी लोकसेवक ज्ञानेश्वर चव्हाण यांना काय करायचे असे विचारणा केली असता त्यांनी त्यांचे टेबलवर ठेवलेली प्रकाश लक्ष्मण कांबळे यांची फाईल उघडली व इशारा करून त्यात रक्कम ठेवण्यास सांगितली. त्याप्रमाणे मी दिनांक २७.११.२०१८ रोजी लोकसेवक यांनी लाचेच्या रकमेची मागणी केली असल्याने मी माझेकडील अँथ्रासीन पावडर लावलेली लाचेची रक्कम रू. ३,५००/—(रू. ५००/—दराच्या ७ भारतीय चलनी नोटा) त्यांने उघडलेल्या फाईल मध्ये ठेवली व लागलीच पुर्व नियोजीत केसांवरून डावा हात केसांवरून फिरवून पोलीसांना इशारा केला.

त्यावेळी लागलीच पोलीसांनी लोकसेवक ज्ञानेश्वर चव्हाण यांस लाचेच्या रकमेसह रंगेहात पकडले.

माझे लोकसेवक ज्ञानेश्वर चव्हाण, लिपीक यांचेशी कोणतेही पुर्ववैमनस्य नाही. लोकसेवक यांना मला लाच देण्याची इच्छा नसल्याने त्याचेवर कायदेशिर कारवाई होण्याची विनंती आहे.

माझी वरील फिर्याद मराठीत टंकलिखीत केली असून ती माझे सांगण्याप्रमाणे बरोबर व खरी आहे.

समक्ष,

(अभय दाभाडे),
पोलीस निरीक्षक,
ला.प्र.वि., मुंबई.

POLICE ★ सत्यमेव जयते MUMBAI ...RUPTION BUREAU

तक्रारदाराने/फिर्यादीने तक्रार करण्याकरीता झालेल्या विलंबाची कारणे ..........
Reasons for delay in reporting by the complainant/informant

9) चोरीस गेलेल्या/अंतर्भुत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.
Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

..........

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भुत मालमत्तेचे एकूण मुल्य ..........
Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक : ..........
Unnatural / Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.
First Information brief contents (Attach separate sheet. if required) : Detail write down back blank page.

यातील नमुद ता.वे. व ठि. यातील आरोपी लोकसेवक ज्ञानेश्वर चव्हाण यांनी फि" यांचेकडे त्यांचे मयत काका नामे दिपक पांडुरंग कोबळे यांचे मृत्युनंतर त्यांचे पत्नीस कुटुंब निवृत्ती वेतन व उपदान तसेच वारस नोकरी (अनुकंपा) मिळणेकरीता। दाखल केलेल्या दावा फाईल मधील त्रुटींची दुरुस्ती करून पुढे पाठविण्याकरीता पडताळणी दरम्यान दि.२७/११/२०१८ रोजी रु.४०००/- चे लाचेची मागणी करून तडजोडी अंती ३,५००/- रु. लाच रक्कम आज रोजी पंचासमक्ष स्विकारताना रंगेहाथ पकडले म्हणून गुन्हा नोंद.

13. केलेली कार्यवाही :- 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा :

..........

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण,

..........

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन .........., जिल्हा .........., राज्य ..........,

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.) .......... Rank.......... No. .......... to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to .......... (3) Transferred to P.S .........., District .......... on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant/informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/informant, free of cost.

(R.O.A.C.)

INSPECTOR OF POLICE ★ सत्यमेव जयते MUMBAI ★ ANTI-CORRUPTION BUREAU

14. तक्रारदाराची सही व अंगठा
Signature and Thumb impression of the Complainant / Informant.

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.
Signature of Officer In-charge, Police Station
संपूर्ण नाव Name ... अभय दाभाडे ...
पदनाम Rank ... पोलिस निरीक्षक
तपासिक ... चा कोड. क्र. ला.प्र.वि.

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख ..........
1. Date and time of submitted to the Court.
Code No. of I. O. ..........

प्रत, 2. फिर्यादी, 3. पोलीस अधीक्षक (संगणक), 4.तपासिक अंमलदार, 5. स्थळ प्रत.
Copy to, 2. Complainant, 3. Supdt. of Police (Computer), 4. Inv. Officer, 5. Office Copy.

Attachment to item 7 of **First Information Report**